सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला,बी.जे. रोड पुणे-०१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ विस्तारीत क्र. २१७ ते २१९ email:- agricredit16@gmail.com

जा.क्र.कृषिपत-11/जि.म.स. बँक व्याज परतावा/2025-26/2025/ ५१. दिनांक:- 18.08.2025

**सुधारीत आदेश**

**वाचले:-**

1) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.सीसीआर 1406/प्र.क्र.247/2-स दि. 17/05/2006
2) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सीसीआर 0313/प्र.क्र. 144/2-स, दि. 05/09/2014
3)शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकिर्ण-0525/प्र.क्र.124/2-स, दि.03.07.2025
4)या कार्यालयाकडील आदेश क्र.सम दिनांक 8.7.2025.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाने, संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक 1 व 2 अन्वये राज्यातील शेतकऱ्यांना 6% व्याजदराने अल्प मुदत पीक कर्ज उपलब्ध होण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना व्याज परतावा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयान्वये बँकांनी शेतकऱ्यांना रुपये तीन लाख रुपया पर्यंतचे पीककर्ज 6 % व्याजदराने दिल्यास राज्य शासनाकडुन बँकांसाठी 2.50 % व्याज फरकाच्या रकमेचा आर्थिक भारसहन करण्यात येत आहे. या धोरणानुसार बँका 6% व्याज दराने शेतक-यांना पीककर्ज पुरवठा करीत आहेत. या निर्णयाचा लाभ शेतकऱ्यांनी बँकाकडुन घेतलेल्या अल्प मुदत पीक कर्जास देण्यात येत आहे. प्रस्तुत योजन अंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना रु. तीन लाखांपर्यतचे अल्प मुदतपीक कर्ज वार्षिक सहा टक्के व्याज दराने उपलब्ध करुन देणाऱ्या बँका लाभ घेण्यास पात्र आहेत व या बँका या योजने खालील लाभार्थी आहेत.

शासनाने संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक 03.07.2025 अन्वये सन 2025-26 मध्ये योजना अंमलबजावणीचे आदेश निर्गमित केले आहेत. सदर योजनेसाठी सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. 312.91 कोटीची (रु. तीनशे बारा कोटी एक्याण्णव लाख फक्त) अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध आहे. या तरतुदीपैकी दिनांक 03.07.2025 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रु. 187.75 कोटी वितरणासाठी उपलब्ध करुन दिले आहेत. या कार्यालयाकडे लाभार्थी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे या योजने खालील व्याज परतावा मिळणे बाबतचे प्रस्ताव शासन निर्णयातील तरतूदीनुसार व या कार्यालयाच्या परिपत्रकानुसार वैधानिक लेखापरीक्षकांकडुन तसेच संबंधित जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1 यांचेकडून तपासून व प्रमाणित करुन प्राप्त झालेले आहेत.

सदर शासन निर्णय दिनांक 03.07.2025 मधील तरतुदीनुसार बँकांचे व्याज परतावा मागणी प्रस्ताव मंजूर करुन रक्कम अदा करण्याबाबत संदर्भिय दिनांक 8.7.2025 रोजीच्या आदेशामध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश**

शासन निर्णय दि. 03.07.2025 अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, रक्कम रु. 187,75,00,000/- (रु. एकशे सत्त्याऐंशी कोटी पंचाहत्तार लाख फक्त) खालील प्रपत्र “अ” मधील स्तंभ क्र. 2 मध्ये नमुद लाभार्थी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना, स्तंभ क्र. 3 मध्ये नमुद कालावधी करिता, स्तंभ क्र. 4 मध्ये नमुद 2.50% दराने व्याज परतावा रक्कम मंजूर करुन यापैकी स्तंभ क्र. 6 मध्ये नमुद एकुण रक्कम रु. 187,75,00,000/- (रु. एकशे सत्त्याऐंशी कोटी पंचाहत्तार लाख फक्त) अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच अहमदनगर, पुणे, सोलापूर व लातूर या जि.म.स. बँकांचे सन 2021-22 वार्षीक/ अतिरीक्त कालावधीचे प्रस्ताव या कार्यालयाकडील आदेश क्र. कृषिपत-11/जिमस बँक व्याजपरतावा/2024-25/2025/734, दिनांक 27.03.2025 अन्वये मंजुर करुन एकुण प्रस्तावांपैकी उपलब्ध निधीनुसार अंशत: रक्कम अदा केली आहे व उर्वरीत रक्कम अनुक्रमे रु. 137872813/-, रु. 148353151/-, रु. 37027405/- व रु. 50000000/- या आदेशाद्वारे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सन 2021-22 वार्षिक प्रस्ताव रक्कम रु. 105225733 पैकी रु. 51227295/- मंजुर करुन या आदेशाद्वारे अदा करण्यास व उर्वरीत रक्कम रु. 53998438/- या नंतर प्राप्त होणाऱ्या निधीमधुन अदा करण्यास मान्यता देण्यात

येत आहे. त्याचप्रमाणे बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सन 2022-23 अतिरीक्त प्रस्ताव रक्कम रु. 1237445 पैकी रु. 1160442/- मंजुर करुन या आदेशाद्वारे अदा करण्यास व उर्वरीत रक्कम रु. 77003/- या नंतर प्राप्त होणाऱ्या निधीमधुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सन 2020-21 वार्षिक व अतिरिक्त प्रस्तावासाठी या कार्यालयाकडील दिनांक 27.3.2025 रोजीच्या आदेशाव्दारे अदा केलेली अतिरिक्त रक्कम रु.1000000 लाख या आदेशाव्दारे समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रपत्र-अ

| अ. क्र. | जि.म.स. बँक | प्रस्ताव कालावधी | व्याज परतावा प्रस्तावाप्रमाणे मागणी | मागील शिल्लक रक्कम | या आदेशाद्वारे अदा करावयाची रक्कम | प्रस्तावातील शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | ठाणे | 2021-22 वा. | 39158337 | 0 | 39158337 | 0 |
| 2 | अहमदनगर | 2021-22 वा. | 221713011 | 137872813 | 137872813 | 0 |
| 3 | पुणे | 2021-22 वा | 393546869 | 148353151 | 148353151 | 0 |
| | | 2021-22 अ | 116660749 | 0 | 116660749 | 0 |
| 4 | सोलापूर | 2021-22 अ | 92492562 | 37027405 | 37027405 | 0 |
| 5 | कोल्हापूर | 2021-22 वा | 186736917 | 0 | 186736917 | 0 |
| | | 2021-22 अ | 185775526 | 0 | 185775526 | 0 |
| 6 | सांगली | 2021-22 वा | 158128635 | 0 | 158128635 | 0 |
| | | 2021-22 अ | 98341942 | 0 | 98341942 | 0 |
| 7 | सातारा | 2021-22 वा | 257049699 | 0 | 256049699 | 0 |
| 8 | औरंगाबाद | 2021-22 वा | 82889379 | 0 | 82889379 | 0 |
| 9 | परभणी | 2021-22 वा | 49777805 | 0 | 49777805 | 0 |
| 10 | लातूर | 2022-23 वा | 147699031 | 50000000 | 50000000 | 0 |
| 11 | अकोला/वाशिम | 2021-22 वा | 209993697 | 0 | 209993697 | 0 |
| 12 | बुलडाणा | 2022-23 वा | 13347770 | 0 | 13347770 | 0 |
| | | 2022-23 अ | 1237445 | 0 | 1160442 | 77003 |
| 13 | चंद्रपूर | 2021-22 वा | 105225733 | 0 | 51227295 | 53998438 |
| 14 | बीड | 2023-24 वा | 54998438 | 0 | 54998438 | 0 |
| | एकुण | | 2414773545 | 373253369 | 1877500000 | 54075441 |

याबाबत प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी संदर्भीय शासन निर्णयामधील अटींची पुर्तता झाली आहे. म्हणुन उपरोक्त प्रपत्र अ मधील स्तंभ क्र.2 मध्ये नमुद केलेल्या लाभार्थी बँकांना स्तंभ क्र. 6 मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण रक्कम रु.187,75,00,000/- (रु.एकशे सत्याऐंशी कोटी पंचाहत्तर लाख फक्त) मंजुर करुन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरची रक्कम 2024-25 च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन खालील लेखाशिर्षाखाली खर्च करण्यात यावी.

" मागणी क्र.व्ही- 2, मुख्य लेखाशिर्ष-"2425- सहकार- (00)(107),सहकारी पतसंस्थांना सहाय्य-(01)(16) राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे सक्षमीकरणासाठी अर्थसहाय्य (2425 2524)- 33, अर्थसहाय्य".

या कार्यालयातील लेखाधिकारी यांनी उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे व्याज परताव्याची रक्कम कोषागारातून आहरित करुन सबंधित बँकांना खालील प्रपत्र ब मध्ये नमुद बँक खात्यावर नियमित पद्धतीने अदा करावी.

प्रपत्र ब

| अ.क्र. | जि.म.स. बँक | या आदेशानुसार एकुण अदा रक्कम | बँक / शाखा खाते नं. IFSC Code |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | ठाणे | 39158337 | स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा कलेक्टर कॅम्पस,ठाणे अकौंट नं. 11208816896 IFSC SBIN0004319 |
| 2 | अहमदनगर | 137872813 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा अहमदनगर खाते क्र. 33707747014 IFSC SBIN0000303 |
| 3 | पुणे | 265013900 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पुणे कँप खाते क्र. 11099450443 IFSC SBIN0000454 |
| 4 | सोलापूर | 37027405 | स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा बाळीवेस, 2-अे, बुधवार पेठ, सोलापूर खाते क्र. 11087721237 IFSC SBIN0000483 |
| 5 | कोल्हापूर | 372512443 | आयडीबीआय बँक, शिवाजी चौक,कोल्हापूर, खाते क्र. 463102000005517 IFSC IBKL0000463 |
| 6 | सांगली | 256470577 | स्टेट बँक ऑफ इंडिया सांगली, शाखा गणपती मंदिराजवळ, सांगली खाते क्र. 11230237458, IFSC SBIN0000471 |
| 7 | सातारा | 256049699 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा प्रतापगंजपेठ,सातारा खाते क्र. 11213247130 IFSC SBIN0000473 |
| 8 | औरंगाबाद | 82889379 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा क्रांती चौक,औरंगाबाद खाते क्र. 11134727045 IFSC Code- SBIN0001716 |
| 9 | परभणी | 49777805 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा स्टेडीयम, परभणी खाते क्र. 52071286682 IFSC SBIN0020016 |
| 10 | लातूर | 50000000 | आयडीबीआय बँक, औसा रोड लातूर, खाते क्र. 497102000002561 IFSC IBKL0000497 |
| 11 | अकोला/ वाशिम | 209993697 | स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा अकोला खाते क्र. 11125056789 IFSC SBIN0000306 |
| 12 | बुलडाणा | 14508212 | दि महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटीव्ह बँक लि. शाखा टाऊन सेंटर, सिडको औरंगाबाद, खाते क्र. 0071107310000009 IFSC MSCI0082064 |
| 13 | चंद्रपूर | 51227295 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा चंद्रपूर खाते क्र. 11014451185 IFSC SBIN0000346 |
| 14 | बीड | 54998438 | स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बीड,हिना हाईटस् जालना रोड, बीड खाते क्र. 30727301078 IFSC SBIN0003668 |
| | एकुण | 1877500000 | |

व.लि.(गिते) का.अ.(श्रीम.तुपे) स.नि.(श्री.सोनवणे)

उपनिबंधक (श्री.माळी) मा.अ.आ.

**(दिपक तावरे, भाप्रसे)**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रति :-** 1) कोषागार अधिकारी, पुणे
2) कार्यासन अधिकारी, अंदाज व नियोजन कार्यासन, मुख्यालय, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीस्तव
3) लेखाधिकारी, मुख्यालय, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीस्तव

**प्रत माहितीसाठी** (Email द्वारे) :-
1) कार्यासन अधिकारी (2-स) महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
2) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था — सर्व संबंधित
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (यादीप्रमाणे) :- यांना कळविण्यात येते की, वरील आदेशात नमुद केल्याप्रमाणे प्राप्त रकमेचा विनियोग दाखला या कार्यालयाकडे सादर करावा.

## -: प्रमाणपत्र :-(1)

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकिर्ण-0525/ प्र.क्र. 124/ 2-स, दिनांक 03.07.2025 अन्वये रक्कम रु.187,75,00,000/- (रु.एकशे सत्याऐंशी कोटी पंचाहत्तर लाख फक्त) खर्चाच्या आदेशात खाली नमुद केलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या योजने अंतर्गत लाभार्थी आहेत.

| अ.क्र. | बँक | बँकेमार्फत पीक कर्जवाटप केलेल्या शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | ठाणे | 41223 |
| 2 | अहमदनगर | 313405 |
| 3 | पुणे | 372232 |
| 4 | सोलापूर | 55915 |
| 5 | कोल्हापुर | 432101 |
| 6 | सांगली | 331816 |
| 7 | सातारा | 239445 |
| 8 | औरंगाबाद | 189322 |
| 9 | परभणी | 85584 |
| 10 | लातूर | 238808 |
| 11 | अकोला/वाशिम | 123535 |
| 12 | बुलडाणा | 17798 |
| 13 | चंद्रपुर | 68371 |
| 14 | बीड | 50980 |

**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था (अं.व नि.)**
**मुख्यालय पुणे**

(दिपक तावरे, भाप्रसे)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

व.लि.(श्री.गिते)

का.अ.(श्रीमती तुपे)

सहा.निबंधक (श्री.सोनवणे)

उपनिबंधक (श्री.माळी)

मा.अपर आयुक्त

# -: प्रमाणपत्र :-(2)

प्रमाणित करण्यात येते कि,शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकिर्ण-0525/ प्र.क्र. 124/2-स, दि.03.07.2025 अन्वये राज्यातील शेतक-यांना 6% व्याजदराने अल्पमुदत कर्जपुरवठा करणेसाठी सन 2025-26 करिता उपलब्ध झालेल्या निधीच्या वितरणा बाबत ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका यांनी शेतक-यांना 6% व्याजदराने अल्पमुदत पीक कर्जवाटप केले आहे त्यांना राज्य शासना कडून व्याज परतावा देण्याचा निर्णय राज्य शासनाने वर्ष 2025-26 मध्ये घेतला आहे.

त्यानुसार दिनांक 03.07.2025 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून घेण्यात आलेली आहे.तसेच सदरची रक्कम या आर्थिक वर्षातच संवितरीत करण्यात येईल.

**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था (अं.व नि.)**
**मुख्यालय पुणे**

(दिपक तावरे, **भाप्रसे**)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

व.लि.(श्री.गिते)     का.अ.(श्रीमती तुपे)     सहा.निबंधक (श्री.सोनवणे)

उपनिबंधक (श्री.माळी)     प्रा.अपर आयुक्त

# महाराष्ट्र कोषागार नियम 282

**-: प्रमाणपत्र :- (3)**

महाराष्ट्र कोषागार नियम 282 अन्वये प्रमाणित करण्यात येते की, कोषागारातून प्रत्यक्ष आहरित केलेल्या खर्चाची रक्कम रु.187,75,00,000/-(रु.एकशे सत्याऐंशी कोटी पंचाहत्तर लाख फक्त) संबंधितांना त्वरीत अदा करण्यात येईल तसेच तो खर्च नंतरच्या खर्चासाठी शिल्लक ठेवला जाणार नाही.

सदरहू रक्कम त्वरित संवितरणा साठी काढण्यात येत असून अर्थसंकल्पीय अनुदाने व्यपगत होण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने अथवा कोणत्याही इतर कारणासाठी काढण्यात आलेली नाही.

**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था (अं.व नि.)**
**मुख्यालय पुणे**

(दिपक तावरे, भाप्रसे)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

व.लि.(श्री.गिते)    का.अ.(श्रीमती तुपे)    सहा.निबंधक (श्री.सोनवणे)

उपनिबंधक (श्री.माळी)    मा.अपर आयुक्त

## -: प्रमाणपत्र :-(4)

प्रमाणित करण्यात येते कि, शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. संकिर्ण-0525/ प्र.क्र. 124/2-स, दि.03.07.2025 अन्वये राज्यातील शेतक-यांना 6% व्याजदराने अल्पमुदत कर्जपुरवठा करणा-या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा 2.50% व्याज फरकाच्या रक्कमेचा आर्थिक भार राज्यशासन सोसणार आहे. सदरची रक्कम संबंधितांना अदा करताना उपरोक्त उल्लेख केलेल्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून घेण्यात आलेली आहे.

**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था (अं.व नि.)**
**मुख्यालय पुणे**

(दिपक तावरे, भाप्रसे)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

व.लि.(श्री.गिते) का.अ.(श्रीमती तुपे) सहा.निबंधक (श्री.सोनवणे)

उपनिबंधक (श्री.माळी) मा.अपर आयुक्त